# मोशेने आपल्या लोकांना देवाची ओळख करुन घेण्यास मदत केली. एकाच सर्वश्रेष्ठ देवाची आनंददायी व भयावह सत्ये सांगितली

मुलांना शिकवणायांनी D4b हा अभ्यास वाचावा.

पौल-तिमथी अभ्यास **नवशिक्या मेंढपाळांना प्रशिक्षण देणायांसाठीची मार्गदर्शकतत्वे Aof** अद्याप तुम्ही वाचली नसतील तर कृपया आता वाचा.

**प्रार्थना :** ''सर्वसमर्थ आणि दयाळू देवा, तू मोशेच्या द्वारे मनुष्यांना स्वत:ला कसे प्रकट केलेसे हे सांगून तू कसा आहेस हे तुझ्या लोकांना शिकवण्यासाठी माझे साहाय्य कर.''

**योहाना 1:17** ''नियमशास्त्रा द्वारे देण्यात आले होते, कृपा व सत्य ही येशू ख्रिस्ताच्या द्वारे आली''.

सध्याच्या गरजा आणि उपलब्ध वेळ यानुसार कार्यक्रम निवडा.

1. **देवाने आपल्या लोकांना, इस्राएलला, स्वत:ची ओळख कशी करुन दिली याविषयी शिकण्यास तुमच्या मनाची व अंत:करणाची तयारी करा.**



- सुमारे 4000 वर्षांपूर्वी देवाने विश्वासू अब्राहामाच्या संततीला, इस्राएलला आपले पवित्र लोक, होण्यासाठी निवडले.
- या नंतर सुमारे 500 वर्षांनी देवाने अद्‌भुतरित्या इस्राएल लोकांची इजिप्तमधील गुलामगिरीतून सुटका केली आणि मोशेच्या द्वारे नियमशास्त्राच्या जुन्या कराराची स्थापना केली. ते एका पवित्र सर्वसमर्थ देवाचे भय बाळगण्यास आणि आज्ञापालन करण्यास शिकले, त्यांचे अनुभव हे आज आमच्यासाठी उदाहरण असे आहेत. (करिंथ 10:6)
- सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देवाने, येशू मरण पावला आणि मृतांतून पुन्हा उठला तेंव्हा जुन्या कराराच्या नियमशास्त्राच्या जागी सर्व लोकांसाठीच्या कृपेच्या नव्या कराराची स्थापना केली.
- पाहा निर्गम 1 मध्ये इजिप्तच्या राजाला इस्राएली लोकांची भीती वाटली आणि त्याने त्यांची संख्या मर्यादित ठेवण्यास का सांगितले. (कालांतराने, अशाच प्रकारे हेरोद राजाने, नवजात राजा येशूचा नाश करण्याच्या प्रयत्नात बेथलेहेममधील पुरुष बालकांची कत्तल केली)
- पाहा निर्गम 2 मध्ये देवाने बाळ मोशेला मरणापासून कसे वाचवले आणि मोशेने आपल्या स्वत:च्या मानवी प्रयत्नांनी आपल्या लोकांची सुटका करण्याचा प्रयत्न केला तेव्हा काय घडले.
- पाहा निर्गम 3 मध्ये सार्वकालिक देवाने मोशेला कोणत्या कार्यासाठी पाठवले आणि देवाचे पवित्र नाव काय आहे.


**ख्रिस्ती लोक दैववादी का नाहीत** हे स्पष्ट करुन सांगण्याची तयारी करा. दैववाद ही, आमचे भवितव्य देवतांना किंवा ग्रह-तायांना आगाऊ माहित असते आणि आमचे दारिद्र, दु:ख व अपयशाचे विधिलिखित आम्हांला बदलता येत नाही अशी क्रूर, सैतानी कल्पना आहे. सार्वकालीक **मी आहे** हा कालातीत आहे, त्यानेच कालाची (वेळेची) निर्मिती केली आणि त्याच्यावर काळाचे बंधन नाही. येशूने म्हटले, ''अशी वेळ येत आहे'' (माणसाचा दृष्टीकोण) ''आता आलीच आहे'' (देवाचा दृष्टीकोण) तेव्हा तो मृतांना पुनरुत्थानासाठी किंवा न्यायासाठी उठवणार आहे (योहान 5:28-29). त्याने म्हटले, ''अब्राहामचा जन्म झाला त्यापूर्ती **मी आहे**'' (योहान 8:58). तो कालात आणि अवकाशात अशा दोन्ही ठिकाणी सर्वत्र आहे. भविष्यात आम्ही काय करणार आहोत हे देव


पाहतो, परंतु आम्हांला तसेच करण्यास तो नेहमीच भाग पाडतो असे नाही. त्याचे पूर्वज्ञान आमचे जीवन बदलून टाकण्याचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य रद्द करीत नाही. येशूने म्हटले, ''सत्य तुम्हांला बंधमुक्त करील'' (योहान 8:32). दैववादाच्या क्रूर-दुष्ट बेडयांतून तुमच्या मंडीळीची सुटका कर! देव आम्हांला ओळखतो, आमच्यावर प्रीती करतो आणि आमचे ऐकतो. आमचे कल्याण होईल आणि त्याच्या नावाचे गौरव होईल अशा प्रकारे तो आमच्या मार्गात हस्तक्षेप करील. उत्पत्ती 1 मध्ये सांगितले आहे की, आमचे पूर्वज देव किंवा आत्मे नव्हते तर माणसेच होते आणि देवाने ग्रह-तारे निर्माण केले ते वेळ आणि ऋतू समजावेत म्हणून आमचे भवितव्य ठरवण्यासाठी नाही.

आमच्या सैतानी सत्ता चालत नाही, **त्यापासून आम्ही मुक्त का आहोत** हे स्पष्ट करुन सांगण्याची तयारी करा. इजिप्तचा राजा देवाच्या लोकांना गुलामगिरीतून सुक्त करण्यास तयार नव्हता तेव्हा देवाने मोशेला पीडा उत्पन्न करण्याचे सामर्थ्य दिले यावरुन इजिप्तच्या खोटया दैवतांवरील देवाचे सामर्थ्य प्रकट झाले (निर्गम अध्याय 7-11) इजिप्तच्या लोकांचा असा विश्वास होता की त्यांच्या मोठया नदीच्या, नाईलच्या ठायी मोठी अलौकिक सामर्थ्य आहे. म्हणून देवाने तिच्या पाण्याचे रकन केले! ते सूर्याची उपासना करीत म्हणून देवाने त्याचा प्रकाश काढून घेतला. ते पशूंना दैवत मानून उपासना करीत म्हणून देवाने गाई-गुरे, पिसवा, माशा आणि बेडकांचा उपयोग करुन पीडा आणल्या. तुमच्या मंडळीला खोटया आत्म्यांच्या। भयापासून सोडवण्याची विनंती एकमेव सर्वसमर्थ देव अशा येशूकडे करा!

मोशेच्या पाच पुस्तकांनी उर्वरित पवित्र शास्त्राकरीता पाया कसा घातला याचे स्पष्टीकरण करण्याची तयारी करा:

- उत्पत्ती देवाने शून्यातून सर्व काही कसे निर्माण केले आणि सैतानाने मनुष्याला आज्ञा मोडण्याच्या मोहात कसे पाडले, जगाला भ्रष्ट करुन वेदना-दु:ख, शिक्षा व मरण आणले हे प्रकट करते.
- निर्गम मध्ये सर्वसमर्थ, अत्यंत पवित्र असा देव सर्व आत्म्यांमध्ये सर्वश्रेष्ठ आहे असे प्रकट केले आहे. देवाने आपल्या लोकांना प्राचीन नियमशास्त्रा बरोबर दहा आज्ञा दिल्या.
- लेवीय मध्ये देव निर्दोष बळीच्या रक्तार्पणा-द्वारे लोकांची पातकांची कशी क्षमा करतो ते प्रकट केले आहे.
- गणना-लोक देवाचे नियम पाळण्यात कसे अपयशी ठरले याचे वर्णन करते. म्हणून देवाने त्या पिढीला वचनदत्त भूमीमध्ये प्रवेश करण्यास मनाई केली.
- अनुवाद मध्ये देव पातक्यांना शिक्षा करतो आणि आज्ञापालन करणाऱ्यांना आशीर्वादित करतो हे सांगितले आहे.
- ह्या प्राचीन नियम व प्रसंगांमुळे आम्हांला नव्या करारातील महान सत्ये समजण्यास मदत होते.
- येशूचे मरण व पुनरुत्थान ह्या द्वारे पश्चात्ताप करणाऱ्या विश्वासणाऱ्यांना पापक्षमा आणि सार्वकालिक जीवन मिळते.
- येशूने, आमच्या ठायी पवित्र आत्म्याला राहण्यास पाठवण्याची आणि आम्हांला देवाचे आज्ञापालन करण्याचे सामर्थ्य देण्याची आपल्या पित्याला विनंती केली



- सर्व विश्वासणायांना देवाकडून निरनिराळया रुपात कृपादाने मिळतात ह्या क्षमतांचा उपयोग त्यांनी ख्रिस्ताच्या शरीररूपी मंडळीत एकमेकांची सेवा करण्यासाठी करायचा असतो.
- येशू मेलेल्यांना उठविण्यास, पश्चात्ताप न करणायांना शिक्षा करण्यास, विश्वासणायांची शरीरे रूपांतरीत करण्यास आणि आम्हांला गौरवात घेऊन जाण्यासाठी येणार आहे. तिथे आम्ही येशूला समोरा समोर प्रत्यक्ष पाहणार. सदोदित त्याचे गौरव करीत त्याच्या सहवासात राहणार.

**2. सहकायांशी चर्चा करुन आठवडयातील कार्यक्रमांची आखणी करा.**

वरती मुख्य धर्मसिद्धांतांचा उल्लेख केलेला आहे. त्याबद्दल विश्वासणायांचा गैरसमज होत असेल तर त्यांची भेट घेऊन मार्गदर्शन करा आणि प्रार्थना करा.

समजा, तुम्ही प्रशिक्षण देत असलेल्या पुढ्रायांना ह्या पायाभूत मार्गदर्शनाची गरज असेल तर त्यांना तयारी करण्यासाठी मदत करा.

**3. सहकायांशी चर्चा करुन येणाया उपासनासभेची आखणी करा.**

देवाने प्राचीन इस्राएली लोकांची सामाजिक बंधना तून सुटका करण्यासाठी मोशेला कसे तयार केले ते उलगडा करुन सांगा.

- **विचारा व चर्चा करा**-इजिप्तच्या राजाने, हेरोदाने लहान बालकांची बेथलेहेममध्ये कत्तल केली, तसे काय केले.
- देवाने मोशेचे रक्षण कसे केले आणि मोशेने मानवी प्रयत्नांतून आपल्या लोकांची सुटका करण्याचा खटाटोप कसा केला याचे स्पष्टीकरण विश्वासणायांना करण्यास सांगा.

आपण दैववादी का नाही आणि आपण सैतानी सामर्थ्यापासून का मुक्त आहोत याचे स्पष्टीकरण करा (वर दिलेला भाग1)

**विचारा** व चर्चा करा देवाचे **''मी आहे''** ह्या पवित्र नावामध्ये त्याच्या सार्वकालिक जिवित्वाचे प्रतिबिंब कसे पडलेले दिसते.

**विचारा** व चर्चा करा देव कालातीत असला तरी त्याचे पूर्वज्ञान आमचे निवड करण्याचे स्वातंत्र्य नष्ट करीत नाही, असे का (त्याला भविष्यातील दिसते पण आम्ही जे ठरवतो ते घडून आणण्यात तो हस्तक्षेप करीत नही)

**विचारा** व चर्चा करा सत्य **आम्हांला** बंधमुक्त करील असे येशूने म्हटले तेंव्हा त्यातून त्याला काय सांगायचे होते.

मोशेने लिहिलेल्या पांच पुस्तकांची ओळख करुन घेतल्याने लोकांना येशू विषयीचे सत्य कसे समजेल याचे स्पष्टीकरण करा.

मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करण्यासाठी संधी द्या.

दैववादाची उमेद खच्ची करणारी कल्पना आणि अशुद्ध आत्मे व खोटया दैवतांचे गुलाम होणे यापासून ख्रिस्ताने कसे वाचवले याबद्दल विश्वासणायांनी साक्षी द्याव्यात.

**प्रभुभोजनाची** ओळख करुन देण्यासाठी निर्गम 7:17 वाचा, पाण्याचे रक्त करणे हा मोशेचा पहिला चमत्मकार म्हणजे जुन्या करारातील सांकेतिक शाप होता हे स्पष्ट करा. याच्या नियमशास्त्रानुसार लोकांनी आज्ञापालन केले नाही तर ते मरत होते, कारण नियमशास्त्राचा लेख जिवे मारतो (2 करिंथ 3:6). याची तुलना करता, पाण्याचा द्राक्षारस करणे हा येशूचा पहिला अद्‌भुत चमत्कार लोकांना आशीर्वाद देणार होता (योहाना 2:1-11). येशूने प्रभुभोजनाच्या प्याल्याविषयी म्हटले, ''हा माझ्या रक्तात नवा करार आहे'' (लूक 22:20).

दोन किंवा तीन जणांचे गट करुन एकमेकांकरीता प्रार्थना करा आणि येशू विषयीची मूलभूत तत्वे मित्रमंडळीला शिकवण्यासाठीच्या योजना आखा.

**पाठ करा 1 करिंथ 10:5-6**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net